सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- २०१९/तक्रार क्र. बीएम- १०७/०१**

**तक्रारकर्ता श्री. सुर्यकांत पांडूरंग चौगुले**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (अति/निष्का)**
अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, ७ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व) मुंबई -५१.

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (अति/निष्का) बोरिवली-१**
उपजिल्हाधिकारी (अतिक्रमण /निष्कासन) बोरिवली-१ यांचे कार्यालय,
रुस्तमजी कॉम्पलेक्स, तळमजला, जे.एस.रोड,
दहिसर (प) मुंबई -४०० ०६८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,**
अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) पश्चिम उपनगरे यांचे कार्यालय,
प्रशासकीय इमारत, ७ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व) मुंबई -५१.

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०१.०७.२०२४</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १८.०६.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. अपील क्र. MHSICMU/२०१८/M/००४५१४ प्रकरणी आयोगाने दि.३०.०१.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे आदेश पारित केले आहेत :-

*"उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) बोरिवली- १ यांनी अपिलार्थींनी विचारलेली माहिती उपलब्ध असल्यास त्यांना १५ दिवसांचे आत द्यावी."*

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. २०.०२.२०१९ रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का), मुंबई यांच्याकडून आयोगाने दि. ०९.०४.२०१९ च्या पत्रान्वये अहवाल मागविण्यात आला. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का), मुंबई यांनी दि. १८.०४.२०१९ रोजी त्यांचा अहवाल आयोगास सादर केला आहे. त्यामध्ये नमुद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपजिल्हाधिकारी (अति/निष्का), बोरीवली यांना दि. १६.०४.२०१९ च्या पत्राने कळवून अर्जदार यांना तात्काळ कार्यालयात बोलावून संचिका पाहणी करुन हवी असलेली आवश्यक ते कागदपत्रे विनामुल्य पुरविण्यात यावे व त्याबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल राज्य माहिती आयुक्त यांचेकडे परस्पर सादर करावा.

..२/-

आजच्या सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का), मुंबई व जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपजिल्हाधिकारी (अति/निष्का), बोरीवली उपस्थित असून जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का), मुंबई यांनी असे सादर केले की, त्यांनी जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपजिल्हाधिकारी (अति/निष्का), बोरीवली यांना पत्राव्दारे कळविले की, तक्रारकर्त्यांना माहिती परस्पर उपलब्ध करुन द्यावी.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपजिल्हाधिकारी (अति/निष्का), बोरीवली यांनी असे सादर केले की, सदर प्रकरणासंबंधी कोणतेही कागदपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत. आयोगाच्या अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रे त्यांना उपलब्ध करुन देण्यात आली.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, उपजिल्हाधिकारी (अति/निष्का), बोरीवली यांनी उपलब्ध माहिती तक्रारकर्त्यांना १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये नोंदणीकृत टपालाने निशुल्क पाठवावी.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : ०२.०७.२०२४**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**